नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

## ड्रायव्हरच्या हटवादीपणामुळे सायकलच्या वेगाने धावली पुणे-इगतपुरी बस

**भंडारदरा (वार्ताहर)–** इगतपुरी आगाराची पुणे–इगतपुरी ही बस चक्क सायकलच्या वेगाने ड्रायव्हरने हटवादीपणाने राजूर ते शेंडी असा प्रवास करत आणली. सदर गाडीवर असणारा ड्रायव्हर हा प्रचंड वेगाने गाडी चालवत होता. त्याची कुणीतरी प्रवाशाने तक्रार पोलिसांना केली. त्याचा राग मनात धरून सदर चालकाने हा प्रकार केला. सदरची घटना ही काल संध्याकाळी ७:३० ते ८:३० वाजेच्या दरम्यान घडली.

## द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात कोंडी

**पुणे (प्रतिनिधी)–** नाताळ सण, तसेच नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी बुधवारी लोणावळा, खंडाळ्यात गर्दी केली. पहाटेपासून मुंबईतील पर्यटक लोणावळ्याकडे निघाल्याने द्रुतगती मार्गावर कोंडी झाली. खंडाळा घाटातील वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनांच्या रांगा दहा ते बारा किलोमीटरपर्यंत लागल्या. नाताळ तसेच नववर्ष स्वागतासाठी दरवर्षी मुंबईसह राज्यातील वेगवेगळ्या भागातील पर्यटक लोणावळा, खंडाळा भागात दाखल होतात. बुधवारी सकाळपासून द्रुतगती मार्गावर मोठ्या संख्येने पर्यटकांची वाहने दाखल झाली. यामध्ये मुंबईकर पर्यटकांचा समावेश होता.






# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही यश मिळवायचेय

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील; निझर्णेश्वराचे घेतले दर्शन

**संगमनेर (प्रतिनिधी)–** आमदार अमोल खताळ यांच्या विजयाने तालुक्यात परिवर्तन होऊ शकते हा विश्वास विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सर्वांना मिळाला. भविष्यात अशाच संघटितपणे आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यश मिळवायचे असल्याने त्यादृष्टीने तयारी सुरू करा, असा संदेश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला.

जलसंपदा मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर ना. विखे पाटील यांनी श्रीक्षेत्र निझर्णेश्वर (ता.संगमनेर) येथे येऊन दर्शन घेतले. यानिमित्ताने महायुतीचे पदाधिकारी आणि विखे समर्थक कार्यकर्त्यांनी स्वागत केले. आमदार अमोल खताळ, ज्येष्ठ नेते बापूसाहेब गुळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आबासाहेब थोरात, डॉ.विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष कैलास तांबे, प्रवरा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, निवृत्त सनदी आधिकारी शिवाजी जोंधळे यांच्यासह ज्येष्ठ आणि युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ आपण निझर्णेश्वराच्या येथूनच केला होता. परिवर्तनाची सुरुवात ही विधानसभा निवडणुकीपासून सुरु झाली आहे. तालुक्यातील



जनतेने महायुतीवर विश्वास ठेवून आमदार खताळ यांना ऐतिहासिक विजय मिळवून दिला, विधानसभेतील या विजयामुळे तालुक्यात परिवर्तन होऊ शकते हा विश्वास आपल्या सर्वांना मिळाला आहे, असे स्पष्ट करून ना. विखे पाटील म्हणाले, भविष्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही येणार आहेत. या निवडणुकांतही आपल्याला तालुक्यात परिवर्तन घडवायचे आहे. विधानसभेच्या निवडणुकीप्रमाणेच संघटितपणे या निवडणुकीत यश मिळवायचे आहे. त्यादृष्टीने तयारी सुरू करा, असा संदेशही त्यांनी यानिमित्ताने दिला.

भाजपच्या नेत्यांनी आपल्याकडे आता जलसंपदा विभागाचा कार्यभार सोपविला आहे. यापूर्वी निळवंडे धरणाचे पाणी जिरायती भागाला मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. पण आता एवढ्यावरच आपल्याला थांबायचे नाही. या तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवून हा भाग दुष्काळमुक्त कसा होईल हाच आपला प्रयत्न असणार आहे. गोदावरी आणि कृष्णा हे सर्वात मोठे खोरे आहे. या भागात येणारे सिंचनाचे प्रकल्प निर्धारित वेळेत मार्गी लावण्यासाठी आराखडा तयार करायचा आहे तशा सूचनाही आपण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या असून पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी तुटीच्या खोऱ्यात वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्याचे ध्येय आपले असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार खताळ म्हणाले, तालुक्याला सुजलाम् सुफलाम् करण्याचे भाग्य हे ना. विखे पाटील यांना मिळाले आहे. यापूर्वीही निळवंडे धरणाचे पाणी मिळवून देवून त्यांनी संगमनेर तालुक्याच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली. भविष्यात आता त्यांच्याच मार्गदर्शनाखाली तालुक्याच्या विकासाची गंगा सुध्दा आपल्याला पुढे घेऊन जायची असल्याचे त्यांनी सांगितले. जलसंपदामंत्री पदावर निवड झाल्याबद्दल ना. विखे पाटील यांचा तसेच जिल्ह्यातील महायुतीच्या आमदारांचा नागरी सत्कार ५ जानेवारी रोजी संगमनेर तालुक्याच्यावतीने आयोजित केला असल्याची माहिती आ.अमोल खताळ यांनी दिली.

## डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत आत्मा मालिक राज्यात अव्वल

### २४ बालवैज्ञानिकांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत आत्मा मालिक सेमी इंग्लिश गुरुकुलाच्या २४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत राज्यात अव्वल येण्याचा बहुमान मिळविला.

ही परीक्षा इयत्ता ६ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते. सलग दहाव्या वर्षी आत्मा मालिकचे राज्यात सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले असून विद्यार्थी व शिक्षक यांच्या अथक परीश्रमातून हे यश मिळाले. आजपर्यंत या परीक्षेत २४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा नवा ऐतिहासिक विक्रम गुरुकुलाने केला आहे, असे प्राचार्य निरंजन डांगे



यांनी सांगीतले.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये ऋतुराज कारंडे, पृथ्वीराज नागरगोजे, हर्षवर्धन उंडे, ओंकार तुपे, भावेश पाचारणे, आदिती हुले, प्रांजल काळे, उन्नती सात्रस, उत्कर्ष राजपूत, शिवम पवार, पृथ्वी मापारी, रुद्रा गोसावी, युवराज राजपूत, अरविंद राठोड, धैर्यशील पवार, राम पोले, भगवान ढाकणे, शार्दुल गोरे, मनस्वी सोनवणे, रोहित साठे, श्रेयस बडे, श्लोक पवार, दिग्विजयसिंग पाटील, नाविन्या थोरात या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, पर्यवेक्षक नयना शेटे, गणेश रासने, विषय शिक्षक सोपान शेळके, अथर्व फाऊंडेशनचे नंदकिशोर भाटे, राहूल मिश्रा, शिवम तिवारी, विशाल सिंग, प्रियान्पु कुमार, अनुशिका अस्थाना यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशीर्वादांसह अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, विश्वस्त प्रकाश भट, बाळासाहेब गोर्डे, प्रकाश गिरमे, शालेय व्यवस्थापक, सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आदींनी अभिनंदन केले आहे.

## मस्साजोगमधील देशमुख कुटुंबियांची थोरातांनी घेतली भेट

### हत्येतील सूत्रधाराला कठोर शिक्षा देण्याची केली मागणी

**संगमनेर (प्रतिनिधी)–** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या ही संपूर्ण महाराष्ट्राला हादरवणारी घटना असून काँग्रेस नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेत हत्येमागील सूत्रधाराला कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी केली.

यावेळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख हे देखील उपस्थित होते. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची घटना ही अत्यंत वेदनादायी आणि संपूर्ण महाराष्ट्राला



हादरवणारी आहे. त्यांच्या हत्येमागील गुन्हेगारांना त्वरीत शोधून कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. बीड जिल्ह्यासह राज्यात दहशत वाढविण्यासाठी कारणीभूत कोण आहे आणि यामागील खरा मास्टरमाईंड कोण आहे या गोष्टींची सुद्धा सखोल चौकशी होऊन कारवाई व्हावी. गुन्हेगारांना जात, धर्म काही नसून या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी व जलदगती न्यायालयात सुनावणी करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी, अशी आमची मागणी आहे. गुन्हेगारांवर कायद्याचा धाक असावा लागतो. मात्र सध्या प्रशासनाचा कोणताही धाक राहिलेला नाही. बीड जिल्ह्यामध्ये अशा घटना आहेत की साधा एफआरआय सुद्धा पोलिसांत घेतला जात नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे. देशमुख कुटुंबियांच्या पाठिशी काँग्रेस पक्ष सदैव उभा राहील, असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले. तर परभणी आणि बीड येथील घटना या पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासाला काळीमा फासणाऱ्या आहे. या दोन्ही ठिकाणच्या गुन्हेगारांना तातडीने अटक करावी व पीडित कुटुंबांना न्याय द्यावा अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली.

## समृद्धीवर देर्डे कोऱ्हाळे परिसरात केमिकल टेम्पोला आग

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील देर्डे–कोऱ्हाळे हद्दीतील समृद्धी महामार्गावर केमिकल घेऊन जाणाऱ्या आयशर टेम्पोने अचानक पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. काही वेळातच आगीने संपूर्ण आयशर टेम्पोला वेढले. आगीच्या उंच ज्वाळा सर्वत्र दिसू लागल्या. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या व आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. मात्र आग इतकी भीषण होती की, रात्री ८ वाजता लागलेल्या आगीवर २ वाजता नियंत्रण मिळण्यात यश आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत गर्दी नियंत्रणात आणली. आयशर चालकाने घटनास्थळावरून



धूम ठोकली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना मंगळवारी रात्री घडली.

छत्रपती संभाजीनगरकडून मुंबईच्या दिशेने जाणारा आयशर टेम्पो एम एच २० जी. सी. ३८१७ हा केमिकल घेऊन समृद्धी महामार्गावरून जात असताना देर्डे नजीक केमिकलला अचानक आग लागली. प्रसंगावधान राखत चालकाने वाहन थांबवत बाहेर उडी मारून स्वत:चे प्राण वाचवले.गाडीत केमिकल असल्याने आग आणखी भडकली आणि काही क्षणात आगीचा आगडोंब उसळला. शिर्डी टोल प्लाझा, सिन्नर टोल प्लाझा, सिन्नर नगरपालिका, कोपरगाव नगरपालिका, साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपालिका, श्रीरामपूर नगरपालिका, राहाता

> ▸ या आगीमुळे मुंबईच्या दिशेने जाणारी संपूर्ण वाहतूक बंद करण्यात आली होती. यामुळे पाच ते सहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आगीवर नियंत्रण मिळाल्यानंतर सहा तासांनी वाहतूक सुरळीत करण्यात आली. यावेळी ५०० ते ६०० वाहने खोळंबली होती.

नगरपालिका व गोदावरी बायो रिफायनरी आदी अग्निशमन दलाच्या ११ गाड्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न करूनही आटोक्यात येत नव्हती. अखेर ६ तासांच्या प्रयत्नानंतर रात्री दोन वाजेच्या दरम्यान आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. आगीचे कारण अद्याप समोर आलेले नाही.

पोलीस निरीक्षक संदीप कोळी, महामार्ग पोलीस उपनिरीक्षक विशाल सणस यांच्यासह सिन्नर ग्रामीण पोलीस, समृद्धी हायवे पोलीस, शिर्डी व सिन्नर पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दल आदी घटनास्थळी दाखल होते. या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तरी संबंधित वाहन आगीत खाक झाले. मात्र आग कशामुळे लागली व गाडीत कोणते केमिकल होते यांचा अद्याप तपास लागलेला नाही. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.







सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर येथे मुद्रित करून प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहिल्यानगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१–२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)